# प्रकरण - १३

## अनुदान / सहाय्यता कार्यक्रमाची कार्यप्रणाली

रुग्णालयात गरीब धर्मदाय निधीची व्यवस्था आहे, जर एखादा रुग्ण त्याच्यावरील उपचारांसाठी लागणारे पैसे भरु शकत नसेल तर समाज विकास अधिकारी यांचेकडे मुलाखतीसाठी पाठविले जाते. सदर समाज विकास अधिकारी रुग्णाच्या नातेवाईकाची मुलाखत घेऊन त्या रुग्णाची आर्थिक स्थिती ठरवितात. जर रुग्णाची आर्थिक स्थिती गरीब असेल आणि त्यामुळे जर तो पैसे भरु शकत नसेल तर प्रमुख वैद्यकीय अधिकारी यांचेकडे सवलतीसाठी पाठविले जाते.

प्रमुख वैद्यकीय अधिकारी परिपत्रक क्र. एच.ओ./86489/पी.बी.एस. दि.17.07.1998 नुसार गरीब धर्मदाय निधीमधून रु. 5000/- पेक्षा जास्त रक्कम एकावेळी खर्च करु शकत नाहीत. प्रमुख वैद्यकीय अधिकारी रुग्णाला होणाऱ्या खर्चातील 20 टक्के सवलत परिपत्रक क्र. टी.आर.व्ही. 204 दिनांक 09.05.2000 नुसार गरीब रुग्णाला देऊ शकतात.